धम्मलिपी (ब्राम्ही) वर्णमाला Dhamm (Bramhi) Alphabets.

धम्म लिपी (ब्राह्मी) लिपी :–

धम्म लिपी (ब्राम्ही) लिपी ही भारतातील उकल झालेली सर्वाधिक प्राचीन लिपी आहे. या लिपीत कोरलेली कांही सांकेतिक लिपी सदृश्य लेखने अनेक स्वरूपात पुरातत्त्वज्ञांना पूर्वीही सापडली आहेत. परंतु या साऱ्यांची उकल होऊनही त्यातून आजवर काहीही अर्थबोध झालेला नाही.



Dhamma (Bramhi) Alphabets धम्म (ब्राम्ही) वर्णमाला

Dhamma (Bramhi) Greeting Card धम्म (ब्राम्ही) लिपीत लिहिलेले सदिच्छा–पत्र.

इतिहास :–

इसवी सन पूर्व सुमारे ३०० (तीनशे) वर्षांच्या काळापासून कांही लेखनांमधे खूपच साम्य आढळल्याने कांही युरोपीय तज्ज्ञांना त्यात रुची निर्माण झाली आणि त्यांनी या लेखांची उकल करण्याचा प्रयत्न केला. ही उकल प्रथम सर जेम्स प्रिन्सेप या नाणे–तज्ज्ञाने १८३७मध्ये केली. त्यामुळे भारतीय उपखंडातील इतिहासविषयक लेख व विशेषतः सम्राट अशोकचे शिलालेख आणि स्तंभलेख वाचता येऊ लागले. सम्राट अशोकापूर्वी देखील या लिपीत कांही लिहिले गेल्याचे संकेत मिळतात. कालांतरात या लिपीमधे अनेक बदल घडून आले. परंतु संपूर्ण उपखंडात लेखनातील लिप्यांमधील असाधारण साम्य सम्राट अशोकाच्या काळात आणि त्यानंतर लगेचचच्या काळात दिसून येते. या लिपीला ब्रिटिश तज्ज्ञांनी "अशोक धम्म (ब्राम्ही) लिपी" असे नाव दिले. या काळखंडानंतर भारतात खऱ्या अर्थाने लेखन शास्त्राचा विकास होत गेला. याच लिपीच्या मातृत्वाने या उपखंडात अनेक लिप्या जन्मल्या. आज हीच धम्म (ब्राम्ही) लिपी भारतीय उपखंडातील सर्व लिप्यांची जननी म्हणून ओळखली जाते.

धम्म (ब्राम्ही) व्यंजनांचे आ–कार (काना). धम्म (ब्राम्ही) व्यंजनांचे इ–कार (ऱ्हस्व वेलांटी).

धम्म (ब्राम्ही) लिपीत स्वर व व्यंजनांना स्वतंत्र चिन्हे आहेत. परंतु व्यंजनाला जोडून येणारा स्वर मात्र असा सुट्या चिन्हाने न लिहिता व्यंजनालाच एक लहान जोडूनच लिहिला जातो. देवनागरी लिपीतील या लहान चिन्हांना मराठीत काना, मात्रा, वेलांटी आणि उकार असे म्हणतात. धम्म (ब्राम्ही) लिपीतही तसाच काहीसा प्रकार आहे.

जेव्हा दोन किंवा अधिक व्यंजनांचा उच्चार एकत्रित केला जातो तेव्हा पहिले आणि दुसरे व्यंजन एकाच उभ्या प्रतलात लिहिली जातात. मराठीत या संरचनेला जोडाक्षर म्हणतात.

या लिपी वैशिश्ट्यांना इंग्रजीमध्ये Abugida किंवा Alphasyllabary म्हणतात.

पाली भाषा लिहिण्यासाठी धम्म (ब्राम्ही) लिपीत ८ स्वर, ३२ व्यंजने आणि एक लहान अनुनासिक चिन्ह अशी ४१ चिन्हे होती. पण पाली आणि प्राकृत भाषांबरोबरच पुढील

कालावधीत विकास पावलेल्या भाषांसाठी या लिपीत ऐ, औ हे दोन स्वर आणि श, ष ही दोन नवी व्यंजने लिहिण्यासाठी नवी चिन्हे योजण्यात आली. अशा प्रकारे विकसित झालेल्या धम्म (ब्राम्ही) लिपीत एकूण १० स्वर, ३४ व्यंजने आणि एक अनुस्वार अशी ४५ चिन्हे आहेत.

वर्णांचे वर्गीकरण :–

कण्ठ्य :– क, ख, ग, घ, ङ, अ, ह, आ हे पडजीभ व जिभेची मागची बाजू यांच्या संयोगातून निर्माण होणारे वर्ण.

तालव्य :– च, छ, ज, झ, ञ, इ, य, श, जिभेचा स्पर्श वरचे दात व टाळू या मध्ये होऊन त्यायोगे निर्माण होणारे वर्ण.

मूर्धन्य :– ट, ठ, ड, ढ, ण, र, ष, ळ हे जिभेचा टाळूला स्पर्श होऊन त्यायोगे निर्माण होणारे वर्ण.

दन्त्य :– त, थ, द, ध, न, ल, स हे जिभेचा दातांना स्पर्श झाल्यावर निर्माण होणारे वर्ण.

ओष्ठ्य :– प, फ, ब, भ, म, उ, ओ, औ, हे दोन्ही ओठांमधून निर्माण होणारे वर्ण.

आकार :–

व्यंजनांना "आ" जोडताना, म्हणजेच काना लिहिताना व्यंजन अक्षरात असलेल्या वरच्या बाजूस जाणाऱ्या उभ्या रेषेला उजव्या बाजूस जाणारी रेषा काढली जाते.

धम्म (ब्राम्ही) लिपीतील ३४ व्यंजनांपैकी १३ व्यंजनांना वरच्या बाजूस जाणारी उभी रेषा नाही, म्हणून या व्यंजनांच्या शिरोभागास उजव्या बाजूस स्पर्शून उजव्या बाजूस जाणारी रेषा काढली जाते. ज, ठ, थ, ब या व्यंजनांना कधी कधी ही काना रेषा उजव्या बाजूच्या मध्यातूनही काढली जाते. मात्र ण या व्यंजनास मात्र काना रेषा उजव्या बाजूच्या मध्यातूनच काढली जाते.

इकार–ईकार :–

धम्म (ब्राम्ही) व्यंजनांचे ई–कार (दीर्घ वेलांटी).

व्यंजनाला इकार जोडण्यायसाठी प्रथम काना लिहिला जातो आणि नंतर त्या काना–रेषेच्याच्या उजव्या टोकाकडून वर जाणारी एक लहान रेषा काढली जाते.

काना लिहिण्याच्या स्थाना संबंधीची पद्धत इकार लिहितानाही सारखीच असते.

ईकार लिइण्यासाठी इकाराच्या एका उभ्या रेषेऐवजी समांतर दोन उभ्या रेषा काढतात.

धम्म (ब्राम्ही) व्यंजनांला जोडलेला ऱ्हस्व उ–कार.

धम्म (ब्राम्ही) लिपीतला दीर्घ ऊ–कार.

उकार–ऊकार :–

व्यंजनास उकार जोडण्यासाठी खालच्या बाजूस जाणाऱ्या उभ्या रेषेच्या खालच्या टोकाकडून उजव्या बाजूस जाणारी एक लहान आडवी रेषा काढली जाते. व्यंजन अक्षरात उभी रेषा नसल्यास खालच्या बाजूस अगदी लहान उभी रेषा काढून तिला उजव्या बाजूस जाणारी आडवी रेषा काढली जाते.

ऊकार काढण्यासाठी उकाराच्या रेषेला समांतर आणखी एक रेषा काढली जाते.

धम्म (ब्राम्ही) व्यंजनांचे ए–कार. धम्म (ब्राम्ही) व्यंजनांचे ऐ–कार.

एकार–ऐकार :–

व्यंजनाला एकार जोडण्यासाठी काना देण्यासाठी जशी उभ्या रेषेच्या शिरोभागातून किंवा अक्षराच्या डाव्या शिरोभागातून डावी कडून उजवीकडे जाणारी एक रेषा काढतात तशीच परंतु उभ्या रेषेच्या शिरोभागातून किंवा उजव्या शिरोभागातून उजवीकडून डावीकडे जाणारी लहान रेषा काढली जाते. या रेषेला मात्रा रेषा म्हणता येईल.

व्यंजन अक्षराला ऐकार जोडण्यासाठी एकारासाठी काढलेल्या रेषेला समांतर आणखी एक रेषा काढली जाते. म्हणजेच दोन मात्रा रेषा काढल्या जातात.

धम्म (ब्राम्ही) व्यंजनांचे ओ–कार. धम्म (ब्राम्ही) व्यंजनांचे औ–कार

ओकार–औकार :–

आपण मागील पानांतून काना आणि मात्रा रेषा पाहिल्या आहेतच. एक काना आणि एक मात्रा रेषा एकत्रपणे काढल्या तर तो व्यंजनाचा ओकार होतो तर एक काना आणि दोन मात्रा रेषा एकत्रपणे काढल्या तर व्यंजनाचा औकार होतो.

उजव्या बाजूस शिरोभागी एक ठिपका ° काढून त्या व्यंजनाचे अनुनासिक रूप होते.

धम्म (ब्राम्ही) व्यंजने–अनुनासिकांकित (अनुस्वारांकित).

जोडाक्षरे :–

जेंव्हा एकापेक्षा अधिक व्यंजनांचा उच्चार एकमेकांस जोडून केला जातो तेंव्हा त्या अक्षराला जोडाक्षर म्हणावे. प्राकृत भाषेत जोडाक्षर असलेले शब्द फारच कमी आहेत. जी जोडाक्षरे आहेत त्यांचे सामान्य वर्गीकरण करता येईल. प्राकृत भाषेतील व्यंजनांचे कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, दंतव्य, ओष्ठ्य असे पाच वर्गात वर्गीकरण केलेले आपण पाहिले आहे. यांना अनुक्रमे क–वर्ग, च–वर्ग, ट–वर्ग, त–वर्ग, प–वर्ग असेही म्हणतात. याच वर्गवारीच्या आधारावर जोडाक्षरांची वर्गवारी होऊ शकते.

१. एकाच व्यंजनाचा दुहेरी उच्चार. जसे सक्क, पच्चुपन्न, संकप्प, अत्त....

धम्म (ब्राम्ही) लिपीत ही जोडाक्षरे शक्यतो लिहिली जात नव्हती. त्याऐवजी एकच अक्षर लिहिले जात असे. वाचताना व बोलताना त्या व्यंजनाचा दुहेरी उच्चार केला जाई.

२. एकाच वर्गातील पहिले व दुसरे किंवा तिसरे व चौथे व्यंजन जोडलेले असणे. जसे दुक्ख, गच्छ, मज्झिम, दीट्ठी, सब्बत्थ, बुद्ध, पुप्फ, गब्भ....

धम्म (ब्राम्ही) लिपीत असे शब्द लिहिताना जोडाक्षर लिहिले जात नसे. जोडून येणाऱ्या उच्चारातील दुसरे अक्षर लिहिले जाई. मात्र वाचताना व बोलताना मात्र दोन्ही व्यंजनांचा उच्चार एकत्रितपणे केला जाई. जसे... लुंबिनी स्तंभावरील अशोकाच्या लेखात बुद्ध हा शब्द बुध असा लिहिला आहे.

३. भिन्न वर्गातील दोन व्यंजनांचा उच्चार एकत्रित पणे होत असेल तर मात्र असे उच्चार असलेले शब्द जोडाक्षराने लिहिले जात असत.

या प्रकारच्या लेखनपद्धतीमुळे अशोकाच्या काळात धम्म (ब्राम्ही) लिपीत जोडाक्षरे क्वचितच लिहिली जात. किंबहुना त्या काळात प्रचलित प्राकृत भाषांमधील शब्दांमधे भिन्न वर्गातील अक्षरे जोडून होणाऱ्या जोडाक्षरयुक्त शब्दांचे प्रमाण फारच कमी होते.

सम्राट अशोकाच्या शिलालेखात पुढीलप्रमाणे जोडाक्षरयुक्त शब्द आले आहेत. पजुहितव्यं, समाजम्हि, आराभित्पा, नास्ति, सुस्रुसा, संस्तुत, धंमानुसस्टिया, द्वादस, परात्रा, स्वामिकेन, सम्यपतिपती, मोख्यमतं, अधिगच्य, सक्यमुनी, अभ्युंनमिसति....

जोडाक्षरात ज्या अक्षराचा उच्चार आधी होतो ते अक्षर प्रथम लिहिले जाते आणि त्याच अक्षराला स्पर्श करून खालच्या बाजूस दुसऱ्या उच्चाराचे अक्षर लिहिले जाते. जसे... द्व लिहिताना आधी द आणि त्याला जोडून खाली व लिहिला जातो.

धम्म (ब्राम्ही) लिपीतील जोडाक्षरांची उदाहरणे :–



धम्म (ब्राम्ही) जोडाक्षरे.

धम्म (ब्रह्मी) लिपि

धम्म (ब्राह्मी) लिपि :– भारतातील एक अत्यंत महत्त्वाची प्राचीन लिपी. भारतातील सर्व लिपींची ही जननी आहे. ही तेव्हाची मुळ प्राकृत बोलीभाषा होती पाली, लोकांना कळावे म्हणून हे लेख प्राकृत भाषेत लिहिल्या गेले, बुद्ध तेव्हा लोकांना जीवन कशाप्रकारे चांगले जगावे हे तत्वज्ञान सांगत होते, म्हणून हिचे नाव 'धम्म (ब्राह्मी)' पडले, अशी आख्यायिका आहे.

उत्पत्ती :– धम्म ब्राह्मी लिपीच्या उत्पत्तीविषयी विद्वानांत मतमतांतरे आहेत. ⇨ अलेक्झांडर कनिंगहॅम (१८१४–९३) यांच्या मताप्रमाणे भारतीय चित्रलिपीवरून धम्म (ब्राह्मी) लिपीची उत्पत्ती झाली असावी तथापि सिंधू संस्कृतीच्या चित्रलिपीमधून धम्म (ब्राह्मी) लिपी उत्पन्न झाली असण्याची शक्यता दिसत नाही. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासाचा काळ इ. स. पू. १७०० हा धरला, तर या संस्कृतीच्या लिपीचा काळ आणि धम्म (ब्राह्मी) लिपीचा प्राचीनतम काळ यांमध्ये जवळजवळ १,५०० वर्षांचे अंतर पडते. इ. स. पू. ३२० पूर्वीच्या काळातील धम्म (ब्राह्मी) लिपीचे नमुने आजतरी उपलब्ध नाहीत. तसेच लेखनाचेही पुरावे भारतामध्ये अद्याप तरी सापडले नाहीत. ⇨ गेओर्ख ब्यूलर (१८३७–९८) यांना एरण येथे इ. स. पू. तिसऱ्या शतकातील नाणे सापडले. त्या नाण्यावरील अक्षरे उजवीकडून डावीकडे लिहिलेली आहेत. येर्रागड्डा येथील अशोकाचा लेख नांगरटीप्रमाणे म्हणजे एक ओळ डावीकडून उजवीकडे आणि दुसरी ओळ उजवीकडून डावीकडे असा लिहिला आहे. परंतु अहमद हसन दानी यांच्या मते, एरण येथील नाणे टाकसाळीतच चुकीने पडले आहे आणि येर्रागड्डा येथील लेख धेडगुजरी पद्धतीने लिहिला आहे. त्यामुळे कोणताही कयास त्यावरून करणे चुकीचे ठरेल. ए. वेबर यांच्या मते धम्म (ब्राह्मी) ची उत्पत्ती प्राचीन सेमिटिक लिपीपासून, तर डब्ल्यू. डीके आणि आय. टेलर यांच्या मते ती दक्षिण सेमिटिक लिपीपासून झाली. जोझेफ हालेव्ही यांच्या मताप्रमाणे धम्म (ब्राह्मी) लिपी ही इ. स. पू. चौथ्या शतकातील ॲरेमाइक, खरोष्ठी आणि ग्रीक लिपींची खिचडी आहे. एडवर्ड क्लॉड यांच्या मते फिनिशियन लिपीपासून सेबिअन लिपी उत्पन्न झाली आणि तिच्यापासून धम्म (ब्राह्मी) निर्माण झाली. तथापि सेबिअन लिपी भारतीय लिपीपेक्षा प्राचीन आहे व तिच्याशी तुलना करण्यासाठी त्या काळातील भारतीय लिपीचे पुरावे अस्तित्वात नाहीत. त्यामुळे धम्म (ब्राह्मी) लिपीची सेबिअन लिपीशी सांगड घालता येत नाही. जोझेफ हालेव्ही यांचे मतही संपूर्णतया निराधार आहे कारण ॲरेमाइक व ग्रीक लिपींच्या कितीतरी शतके आधी धम्म (ब्राह्मी) लिपीचा लोक उपयोग करीत होते. गेओर्ख ब्यूलर आणि अहमद हसन दानी यांच्या मते धम्म (ब्राह्मी) लिपी फिनिशिया ते मेसोपोटेमिया यात अस्तित्वात असलेल्या उत्तर सेमिटिक लिपीपासून उत्पन्न झाली.

नॉर्थ सेमिटिक	धम्म (ब्राह्मी)
अक्षराचे नाव	सदृश मराठी अक्षर
अलेफ	अ
गिमेल	ग
तेथ	थ
योद	य
लामेद	ल
पे	प
शिन	श
ताव	त
कोफ	ख
अयिन	इ
झयिन	ज

नॉर्थ सेमिटिक व धम्म (ब्राम्ही) यांतील साम्यदर्शक तक्ता.

राजबली पांडे आणि ⇨ गौरीशंकर ओझा (१८६३–१९४०) यांच्या मते धम्म (ब्राह्मी) च्या निर्मितीचे श्रेय सर्वस्वी भारतीय पंडितांकडेच जाते. गौरीशंकर ओझा यांनी उपनिषदे, आरण्यके यांमधील स्वर, व्यंजने, व्यंजनांचे घोष, अघोष, दन्तव्य, तालव्य, मूर्धन्य यांसारखे बारकावे लेखनविद्येशिवाय येणार नाहीत, असे साधार दाखवून दिले. ऐतरेय बुद्ध तत्वज्ञानात अकार, उकार आणि मकार प्रकार यांच्या एकत्रीकरणाने 'ओम' या अक्षराची निर्मिती होते, असे दाखवून दिले आहे. बौद्ध धम्माचे खूप मोठे नालंदा विद्यापीठ होते ते ब्राह्मणवर्गाने जाळून टाकले आणि संपूर्ण बौद्ध साहित्य त्यामधे सतत १ महिना जळत होते. त्यामधे धम्म लिपीचे बरच साहित्य उपलब्ध होते.

या मतमतांतराच्या गलबल्यातून सर्वसामान्यपणे धम्म (ब्राह्मी) ची उत्पत्ती उत्तर सेमिटिकपासून झाली, हेच मत ग्राह्य धरले जाते. भारतीय तत्वज्ञानांनी या लिपी मध्ये स्वर, व्यंजने, गुण, वृद्धी, ऱ्हस्वदीर्घपद्धती, पाच वर्ग, अक्षरांचे घोष, अघोष इ. भेद अनुनासिके य, र, ल, व हे अर्धस्वर श, ष, स हे उष्म वर्ण हा हा महाप्राण कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, दन्तव्य आणि ओष्ठव्य हे अक्षरभेद इ. गोष्टींची नंतर घातलेली भर मौलिक आहे.

धम्म (ब्राह्मी) अक्षरांचे वैशिष्ट्य म्हणजे बहुतेक अक्षरांच्या आकारामध्ये उभा दंड आहे. उभ्या दंडाच्या तळाशी अर्धवर्तुळात्मक आकार अक्षराला पदकाप्रमाणे उजवीकडे अगर डावीकडे लावलेले आहेत. या नियमाल जो अपवाद आहे, तो म्हणजे ग, ज, म, झ इत्यादी अक्षरांचा.

बाजूच्या तक्त्यावरून ब्राह्मी अक्षरांचे उत्तर सेमिटिक अक्षरांशी असलेले साम्य दिसून येते.

धम्म (ब्राह्मी) लिपीमध्ये अ, इ, उ हे तीन स्वर आणि एकोणीस व्यंजने अशी बावीस अक्षरे आहेत. नॉर्थ सेमिटिक लिपीमध्ये तेवढीच अक्षरे आहेत. या बावीस अक्षरांपैकी अकरा अक्षरांचे परस्परांशी साम्य आहे, ही गोष्ट बाजूच्या तक्त्यावरून स्पष्ट होते.

नॉर्थ सेमिटिक लिपीपासून धम्म (ब्राह्मी) लिपी उत्पन्न झाली, हा सिद्धांत मांडताना ब्यूलर यांनी अनेक कारणे दिली आहेत. नॉर्थ सेमिटिक लिपी पॅलेस्टाइन आणि सिरिया या प्रदेशांत अस्तित्वात होती. पॅलेस्टाइनमधील लोकांना फिनिशियन असे नाव होते. ऋग्वेदातील पणी म्हणजेच फिनिशियन लोक असावेत. हे लोक हरहुन्नरी म्हणून प्रसिद्ध होते. भारताचा सुमेरियन आणि बॅबिलोनियन संस्कृतींच्या लोकांशी व्यापारी संबंध होता, ही गोष्ट मोहें जो दडो, हडप्पा, कालिबंगा इ. ठिकाणच्या उत्खननांमध्ये सापडलेल्या मुद्रांवरून सिद्ध झाली आहे. ज्याप्रमाणे व्यापारी वस्तूंची देवाण घेवाण होते त्याचप्रमाणे सांस्कृतिक संबंधांत लिपींचीही देवाण घेवाण झाल्यास नवल नाही. नाईल नदीच्या काठी असलेली ईजिप्शियन संस्कृती आणि सुमेरियन संस्कृती यांच्यामध्ये व्यापारी दळणवळण होते. या दोन संस्कृतींना जोडणारा पॅलेस्टाइन आणि सिरिया हा एक दुवा होता. ईजिप्तमधील ⇨ चित्रलिपीतून रेखालिपीचा उगम झाला. चित्राकृती संकुचित झाल्या आणि त्या कालांतराने अक्षरखुणा ठरल्या. या अक्षरखुणांच्या निर्मितीचे श्रेय पॅलेस्टाइनमधील लोकांनाच द्यावे लागेल. पॅलेस्टाइनमध्ये गेझर येथे इ. स. पू. आठव्या शतकातील लेख सापडला आहे. या लेखात प्रत्येक महिन्यामध्ये शेतकऱ्याने कोणते काम करावे, याबद्दलची नोंद आहे. हा लेख अक्षरलिपीत लिहिलेला आहे. यावरून अक्षरलिपीचे प्रयत्न पॅलेस्टाइनमध्ये झाले, ही गोष्ट निर्विवाद आहे. मोआबचा राजा मेष याचाही लेख अक्षरलिपीत म्हणजेच नॉर्थ सेमिटिक लिपीत असून तोही पॅलेस्टाइनमध्येच सापडला.मेष सम्राट अशोकाच्या गिरनार लेखातील धम्म (ब्राह्मी) लिपि : इ. स. पू. ३ रे शतक. राजाच्या या लेखातील अक्षरांशी धम्म (ब्राह्मी) लिपीतील अक्षरांचे असलेले साम्य ब्यूलर यांनी दाखविले आहे. बावेरू जातकामध्ये भारतीय व्यापाऱ्यांचा बॅबिलनशी व्यापार होता, असा उल्लेख आहे.



सातवाहन राजा पुळुमावी याच्या नाशिक लेखांतील धम्म (ब्राम्ही) लिपी : इ.स २ रे शतक.

इ. स. पू. सहाव्या शतकात इराणचा (पर्शियाचा) राजा क्षयार्ष आणि ग्रीस यांच्यामध्ये युद्ध झाले. या युद्धात भारताने इराणशी हातमिळवणी केली होती. त्याच वेळी भारताचा ग्रीक संस्कृतीशी परिचय घडला. या कालखंडातच नॉर्थ सेमिटिक लिपीचे भारतात आगमन झाले असावे, असा तर्क ब्यूलर यांनी केला. इ. स. सातव्या शतकात ज्याप्रमाणे संभोटाने मगध देशातून तिबेटमध्ये लेखनकला नेली, त्याप्रमाणे भारतीय व्यापाऱ्यांनी मेसोपोटेमियामधील सेमिटिक लिपी हस्तगत केली. भारतीय तत्वज्ञानांनी आपल्या बुद्धिकौशल्याने मूळ सेमिटिकवर आधारलेल्या धम्म (ब्राह्मी) लिपीत इतकी भर घातली, की तिचे मूळ स्वरूप बदलून ती संपूर्णपणे भारतीय झाली. सेमिटिक लिपीतील मूळ 'मेम' आणि 'नून' या अनुनासिकांवरून पाच वर्गांतील पाच अनुनासिके धम्म (ब्राह्मी) त तयार केली. सेमिटिकमधील 'सामेख' वरून स, ष भारतीयांनी घेतले. परंतु गुण, वृद्धी, संप्रसारण, ऱ्हस्व–दीर्घ स्वर, हलन्त व्यंजने, जोडाक्षरे इ. संशोधन संपूर्णतया भारतीय तत्वज्ञानांचे आहे. धम्म (ब्राह्मी) लिपीमधील अक्षरांची संख्या त्यामुळे सेहेचाळीस झाली.

धम्म (ब्राह्मी) लिपीचा विकास :– भारतातील प्राचीन लेखनकलेचा ज्ञात असलेला पुरावा म्हणून अशोकाच्या (इ. स. पू. सु. ३०३–सु. २३२) धम्म (ब्राह्मी) लेखांचा उल्लेख करावा लागेल. [→ अशोक –२]. अशोकाच्या लेखांचे एकूण मुख्य दोन गट आहेत : (१) प्रस्तरलेख आणि (२) स्तंभलेख. याचेच लघुप्रस्तरलेख आणि लघुस्तंभलेख असे भेद आहेत. सम्राट अशोकाने धम्म (ब्राह्मी) लिपीमध्ये ज्या राजाज्ञा कोरविल्या, त्यांमध्ये एकजिनसीपणा होता. तसा एकजिनसीपणा नंतरच्या काळात राहिला नाही. नंतरच्या काळात अशोकाचा नातू दशरथ याचे लेख, महास्थान सोहगौरा येथील लेख, पश्चिम घाटातील नाणेघाट–लेख, हाथीगुंफा येथील लेख यांमधील लिपी पुष्कळच भिन्न आहे. अशोकाच्या अक्षरांमध्ये जे उभे दंड होते, त्यांची उंची नंतर कमी झाली अक्षरांच्या वळणात फरक झाला. तो फरक देशविशेषाप्रमाणे भिन्न स्वरूपाचाही झाला. हे देशविशेष पुढीलप्रमाणे (१) पूर्व भाग–मगध, कौशांबी, भारहूत, बोधगया, हाथीगुंफा, अयोध्या. (२) उत्तर भाग–तक्षशिला, मथुरा, माळवा. (३) पश्चिम भाग–यामध्ये पश्चिम घाटाचा समावेश होतो. (४) दक्षिण भाग–दक्षिण भारतातील पूर्व भाग, अमरावती शैलगृहातील लेख.

(१) पूर्व भागातील लिपिविशेष :– बिहारमध्ये नागार्जुन शैलगृहामध्ये सम्राट अशोकाच्या नातवाचे–दशरथाचे–तीन लेख आहेत. या लेखांतील अक्षरे अशोकाच्या लिपीतील

अक्षरांहून भिन्न आहेत. भारहूत, बोधगया, हाथीगुंफा, अयोध्या, पभोसा येथील लेखांचा काळ इ. स. पू. दुसरे शतक हा आहे. या काळखंडात भारतावर शकांच्या स्वाऱ्या झाल्या. नवीन संस्कृतीशी संपर्क आल्यामुळे लेखपद्धतीतही फरक झालेला दिसून येतो. या काळामध्ये ज्या अक्षरांमध्ये कोन होते, त्या ठिकाणी अक्षरांना गोलाई प्राप्त झाली. ज्या अक्षरांत गोलाई होती, त्या अक्षरांची उंची कमी होऊन त्यांची जागा कोनांनी घेतली. घ, प, म यांसारख्या तळाशी गोलाकार असणाऱ्यां अक्षरांमधील गोलाई जाऊन त्यांची जागा कोनाने घेतली. इकार झोकदार वेलांटीने दाखविला गेला.

(२) उत्तर भागातील लिपिविशेष :– मथुरेच्या शकांच्या लेखांतून नवीन पद्धती दिसून येते. बोरूने लिहिताना अक्षरांना कमी–अधिक जाडी प्राप्त होते, त्याप्रमाणे मथुरेच्या लेखांतून अ, आ, च, छ, त, भ, य, ल, ह इत्यादी अक्षरांना बोरूने लिहिल्यासारखे वळण प्राप्त झाले. या लेखांचा काळ साधारणपणे इ. स. पू. पहिले शतक आहे. सांचीला जे लेख सापडतात, त्यांचाही काळ साधारणपणे हाच आहे.

(३) पश्चिम भागातील लिपिविशेष :– पश्चिम भागातील लिपिविशेषांचा विचार करताना त्यात सातवाहन सम्राज्ञी ⇨ नागनिका (इ. स. पू. दुसरे शतक) हिचा नाणेघाटातील लेख, पितळखोरे, कोंडाणे, भाजे, कार्ले, नासिक, अजंठ्याच्या सहाव्या शैलगृहातील लेख यांचा विचार करावा लागेल. या लेखांचा काळ इ. स. पू. पहिले शतक ते इ. स. पहिले शतक हा आहे.

(४) दक्षिण भागातील लिपिविशेष :– याच कालखंडातील धम्म (ब्राह्मी) लेख आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील भट्टिपोलू येथील स्तूपावर सापडले आहेत. ब्यूलर यांनी या लेखांचा बारकाईने अभ्यास केला आणि उत्तरेकडील लिपीपेक्षा दक्षिणेकडील लिपी भिन्न होती, असे मत प्रतिपादन केले. मदुरा आणि तिरुनेलवेल्ली या ठिकाणी तमिळ लेख सापडले आहेत.

दक्षिण भारतातील लिपींवर १८७४ मध्ये ए. सी. बर्नेल यांनी साऊथ इंडियन पॅलिओग्राफी हा ग्रंथ प्रसिद्ध केला. १९२२ मध्ये सी. शिवराममूर्ती यांनी इंडियन इपिग्राफी अँड साऊथ इंडियन स्क्रिप्ट्स हा ग्रंथ प्रसिद्ध केला. कुशाण व क्षत्रपकालीन (इ. स. ची सुरुवात ते इ. स. तिसरे शतक).

धम्म (ब्राह्मी) लिपी :– परकीय स्वाऱ्या आणि नव्या सांस्कृतिक संबंधांमुळे लेखनशैली देशकाळविशेषाप्रमाणे बदलत गेली. तिच्यातील अशोककाळीन साचेबंदपणा नष्ट झाला. अक्षरांच्या डोक्यावर बारीक आडवी खूण झाली. हिला ब्यूलर यांनी ‘सेरीफ’ असे नाव दिले आहे. पुढे पुढे या खुणेचे रूपांतर अक्षराच्या डोक्यावरील पोकळ चौकोनात झाले. माळव्यामधील गुप्तांच्या लेखातील अक्षरांवर भरीव चौकोन आहेत. वाकाटक राजांच्या लेखांमध्ये लिपी पेटिकाशीर्षक झाली. दक्षिणेकडे याच काळलखंडातील अमरावती, नागार्जुकोंडा, जगय्यपेटा, सालिहुंडम या ठिकाणी बौद्ध शिलालेख सापडले आहेत. नागार्जुनकोंडा येथील लेखांतील अक्षरांच्या डोक्यावर भरीव त्रिकोण दिसून येतात. उभे दंड लांबलेले आढळतात.

गुप्तकालीन (इ. स. सु. ३०० ते ५५०) धम्म (ब्राह्मी) लिपी :– गुप्तकाळात जी धम्म (ब्राह्मी) लिपी प्रचलित होती, त्या लिपीला ‘गुप्तलिपी’ हे नामाभिधान आहे. गुप्तांचे समकालीन परिव्राजक, राजर्षितुल्य, उच्चकल्प या राजवंशातील राजांची दानपत्रे याच लिपीमध्ये लिहिलेली आहेत. गुप्तलिपीचे पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील असे दोन भेद आहेत. गुप्त काळामध्ये काही अक्षरांमध्ये नागरी अक्षरांचे पूर्वस्वरूप पहावयास मिळते. उदा. ‘ल’, ‘श’ आणि ‘ह’.



गुप्तसम्राट समुद्रगुप्त याच्या अलाहाबाद–स्तंभलेखावरील धम्म (ब्राह्मी) लिपी : इ. स. सु. ४ थे शतक.

कुटिल लिपी :– इ. स. सहाव्या शतकामध्ये उत्तर भारतात गुप्तलिपीमध्ये अक्षरांच्या डोक्यावर लहानसा त्रिकोण असल्यामुळे या लिपीला ‘कुटिल लिपी’ असे नाव पडले. यात अक्षरामधील उभा दंड डावीकडे झुकलेला असून स्वरमात्रा वाकडी आणि लांब आहे. या लिपीमध्ये मंदसोर येथील यशोधर्म्याचा लेख, बुद्धगया येथील राजा महानामन याचा लेख, मौखरी राजांचे लेख, राजा मेरुवर्म्याचे लेख यांचा समावेश होतो.

जेम्स बर्जेस (१८३२–१९१६), जे. एफ. फ्लीट (सु. १८४७–१९१७), ब्यूलर या संशोधकांनी गुप्तकाळानंतरच्या लिपीचे उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील असे भेद केले.

आठव्या शतकामध्ये या लिपीचे (१) उत्तर भारतातील लिपी, (२) गुजरात, राजस्थान आणि मध्य भारतातील लिपी, (३) दक्षिणेकडील लिपी आणि (४) अतिदक्षिणेकडील लिपी असे भेद आढळून येतात. यांचेच दानी यांनी नऊ भौगोलिक भेद केले. भारताच्या निरनिराळ्या भागांत जसजशी स्वतंत्र राज्ये उदयाला आली, तसतसे त्या त्या भागात स्थानिक लिपीचे वर्चस्व वाढले आणि त्यामधून सध्याच्या प्रादेशिक लिपींचा उदय झाला.


















ढ—
ण—
त—
थ—
द—
ध—
न—
प—


मोडी बाराखड्या.
क
ख
ग
घ
ङ
च
छ
ज
झ
ञ
ट
ठ
ड
ढ
ण
त
थ
द
ध
न
प
फ
ब
भ
म
य
र
ल
व
श
ष
स
ह
ळ
क्ष
ज्ञ



#प्राचीनकाळी_शहरांची_नावे_पाली_भाषेत_होती.

मौर्य काळात भारताच्या राजधानीचे नाव पालीबुध्द होते आणि सिरीलंकेचे नाव पालीसिमन्द होते. दोघा गावाच्या नावात पाली शब्द आहेत पालीत पालीचा अर्थ पालीत रक्षित. पालीसिमन्द मध्ये सिमन्दचा अर्थ पवित्र शिकवणीचा मार्गदर्शक या दोन्ही गावांची नावे भगवान बुद्धाच्या नावावर आधारित होती.

नंद राजवंश ते मौर्य वंशाच्या पहिल्या राजापासुन ते शेवटच्या राजापर्यंत पाली प्राकृत भाषेत राजकारभार पाहिला जाई. याचाच अर्थ असा होतो की त्या काळातील लोकभाषा व बुध्दांनी दिलेल्या उपदेशाची भाषा ही #पालीच होती.

– अजय पवार, ७६२०१११३१३.

PALI





--